वाचले :-

1. आदेश क्रमांक साप्रवि/१/कावि/३५२/२०२४, दिनांक १०/१०/२०२४
2. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, पिंपरी यांचेकडील वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र क्र. Reg-२९६१, दिनांक ११/०९/२०२४ अन्वये प्राप्त झालेले अनुकुल वैद्यकीय तपासणी अहवाल
3. पोलिस आयुक्त, नवी मुंबई यांचेकडील प्राप्त झालेले अनुकुल चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल क्र.SB/VERFN/PVTJOB/000308614/2024, दिनांक 04/10/2024
4. मुख्य उद्यान अधीक्षक,उद्यान व वृक्षसंवर्धन विभाग यांचेकडील पत्र क्र.उद्यान/२/कावि/३२४/२०२६ दिनांक २८/१०/२०२६ अन्वये प्राप्त झालेला कामकाज अहवाल
5. अधिकार प्रदान आदेश क्रमांक साप्रवि/२/कावि/४५८/२०२६ दिनांक ०३/१०/२०२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८, सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक सा.प्र.वि/१/कावि/३७१ /२०२६,
दिनांक १९/११ /२०२६

विषय :- श्री.वाळुंज योगेश रंगनाथ यांची "उद्यान अधिक्षक (वृक्ष)" पदावर सरळसेवा प्रवेशाने करण्यात आलेली नियुक्ती नियमित करणेबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर गट 'ब' दर्जाचे 'उद्यान अधीक्षक (वृक्ष)' या अभिनामाची पदे पे लेवल S-१५ ४१८००-१३२३०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गातील रिक्त असलेल्या पदावर उपरोक्त वाचले क्र. १ वरील आदेशान्वये खालीलप्रमाणे अधिकारी यांचे नावासमोर नमूद प्रवर्गामधून प्रथमत: ०२ वर्ष परिवीक्षाधीन कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देण्यात आलेली आहे. तथापि, परिवीक्षाधिन कालावधी जरी २ वर्षाचा असला तरी जोपर्यंत त्यांची नियुक्ती नियमित केली जाणार नाही, तो पर्यंत त्यांची नियुक्ती ही परिवीक्षाधिनच राहील, असे नियुक्ती आदेशात स्पष्टपणे नमूद करणेत आले आहे. खालीलप्रमाणे नमूद 'उद्यान अधीक्षक (वृक्ष)' यांचा नियुक्तीचा प्रवर्ग, रुजू दिनांक व परिवीक्षाधिन कालावधी यांचा तपशील पुढीलप्रमाणे

अ.क्र.	अधिका-यांचे नाव	प्रवर्ग	महापालिका रुजू दिनांक	परिवीक्षाधीन कालावधी संपुष्टात आलेला दिनांक
१	२	३	४	५
१	श्री.वाळुंज योगेश रंगनाथ	खुला	०५/११/२०२४	०४/११/२०२६

उपरोक्त नमूद उद्यान अधीक्षक (वृक्ष) यांचा ०२ वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी हा स्तंभ क्र. ५ मध्ये नमुद केलेल्या दिनांकास संपुष्टात आलेला आहे. तसेच उपरोक्त वाचले क्र.२ अन्वये उक्त अधिकारी यांचे वैद्यकीय तपासणी अहवाल व उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये पूर्व चारित्र्य व वर्तणूक पडताळणी अहवाल प्राप्त झालेले असून ते अनुकूल असे आहेत.

उद्यान व वृक्षसंवर्धन विभाग यांनी उपरोक्त वाचले क्र.४ अन्वये परिवीक्षाधीन कालावधीतील त्यांचे कामकाज अहवाल सादर केलेले असून, त्यांची हजेरी व वर्तणूक समाधानकारक असून सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसलेने श्री.वाळुंज योगेश रंगनाथ यांना 'उद्यान अधीक्षक (वृक्ष)' या पदावर नियमित वेतनश्रेणीत नेमणूक देणेकामी स्पष्टपणे शिफारस केली आहे. तसेच त्यांनी नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार संगणक अर्हता धारण केलेबाबतचे प्रमाणपत्र मनपा सेवेत रुजू होताना सादर केले आहे.

सबब, मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपरोक्त वाचले क्र. ५ चे आदेशान्वये प्राप्त अधिकारानुसार प्रस्तुतच्या आदेशान्वये, तसेच संबंधित विभागप्रमुखांनी केलेली स्वंयस्पष्ट शिफारस, वैद्यकीय तपासणी

अहवाल, पूर्व चारित्र्य व वर्तणूक पडताळणी अहवाल, संगणक अर्हता इत्यादी बाबी विचारात घेता श्री.वाळुंज योगेश रंगनाथ यांना पे लेवल S-१५ ४१८००-१३२३०० या वेतनश्रेणीमध्ये "उद्यान अधीक्षक (वृक्ष)" या पदावर देण्यात आलेली नियुक्ती, त्यांचे मूळ नियुक्ती आदेशातील अटी व शर्तींचे अधीन राहून, ते रूजू झालेल्या दिनांकापासून नियमित करणेस मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.वाळुंज योगेश रंगनाथ, उद्यान अधीक्षक (वृक्ष) यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

Digital Signature:
Signature valid
Name : KHOT SANDEEP DADASAHEB
Designation:Deputy Commissioner
Location:.
Date :19-11-2026 16:49